नियमित दिवाणी दावा क्र.५२/२०२०

निशाणी ५० खाली

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील सरतपास वकील श्री सी. व्ही. जाधव यांचेमार्फत सुरु</u>**

८. माझे नाव दाजी राजाराम खरात, वय ५६ वर्ष, रा. बाळेवाडी, ता. आटपाडी जि. सांगली असे असून माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास वादी तर्फे वकील श्री. व्ही.बी.पाटील यांचेमार्फत सुरु</u>**

९. प्रतिवादी क्र. ३ सुभाष जयवंत खरात हा माझा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे आहे की,सदरचा तपास माझेकरीता व प्रतिवादी क्र. ३ करीता दिलेला आहे. वादी हे माझ्या परिचयाचे आहे. वादीच्या पतीचे नाव बिरुदेव पांडुरंग जगदाळे आहे. ते बाळेवाडीतील राहणारे आहेत. दावा गट नं. २४२ हा बाळेवाडीतील आहे. त्याचे एकूण क्षेत्र ५५ एकर आहे. त्यामध्ये ज्ञानेश्वर तुकाराम गरदाडे, शंकर तुकाराम गरदाडे व रुक्मीणी तुकाराम गरदाडे यांचा चार आणे हिस्सा होता. त्यापैकी मी व माझ्या पुतण्याने ८ एकर १३ गुंठे क्षेत्र विकत घेतले होते. सदर क्षेत्रची माझे नावे नोंद न झालेमुळे सदरचे क्षेत्र पुन्हा वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना विक्री केले होते. सदर खरेदीदस्तावर साक्षीदार म्हणून माझी सही होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती बाबत २ ते ३ दस्त झालेले होते त्याविरुध्द आटपाडी न्यायालयात फौजदारी खटला दाखल

केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर फौजदारी खटलयामध्ये वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ व माझे दरम्यान तडजोड झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडमध्ये मी खरेदी केलेली ३हे. ३३.१७आर. क्षेत्र माझे नावे रहावे अशी तडजोड झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, २हे.२३आर. क्षेत्र वादीच्या लाभात सोडून देण्याचे तडजोडी दरम्यान ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी त्यांचे क्षेत्र वादीचे व माझ्या लाभात सोडून दिल्यामुळे तडजोड झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडीप्रमाणे माझे क्षेत्र माझ्या ताब्यात आहे व वादीचे क्षेत्र वादीच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडीला आमचे पुर्वहक्कदारांची काही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडीप्रमाणे माझ्या नावे असलेल्या क्षेत्राला माझ्या नावाची ७/१२ पत्रकी नोंद केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या नावे असलेली २हे. २३ आर. क्षेत्राला वादीच्या नावाची नोंद होणेस माझी काही हरकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या खरेदीदस्ताबाबत व कब्जेवहिवाटीबाबत माझी काही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीचा दावा मंजूर करणेस माझी काही तक्रार नाही.

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.04.23 18:22:11 +0530

**(अ. जो. बाचुळकर)**

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**आटपाडी**

**आटपाडी.**

**दिनांक : २३/०४/२०२६**

*****